ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक २०८ • शनिवार दि.१६ मे २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.

## मान्सूनची अंदमानात दमदार एंट्री



### महाराष्ट्राच्या दिशेनेही वेगाने वाटचाल

**नवी दिल्ली: प्रचंड उकाडा, वाढते तापमान आणि उष्णतेच्या लाटेमुळे हैराण झालेल्या नागरिकांसाठी अत्यंत दिलासादायक बातमी समोर आली आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, नैऋत्य मान्सूनने अखेर भारतात अधिकृतरीत्या प्रवेश केला असून तो अंदमान आणि निकोबार बेटांवर दाखल झाला आहे. वेळेआधीच महाराष्ट्रात मान्सूनचा पाऊस दाखल होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. मान्सूनच्या आगमनामुळे देशभरातील शेतकरी आणि नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.**

हवामान विभागाच्या माहितीनुसार, मान्सूनने अंदमान समुद्रासह बंगालच्या उपसागराच्या काही भागावर आपला प्रभाव निर्माण केला आहे. श्री विजय पुरमसह अंदमान बेटांमध्ये जोरदार पावसाची नोंद झाली असून परिसरात मान्सूनसदृश वातावरण तयार झाले आहे. सध्या अंदमान परिसरात ताशी ३५ ते ४५ किलोमीटर वेगाने पश्चिमेकडील वारे सक्रिय झाले आहेत. त्यामुळे पुढील तीन ते चार दिवसांत मान्सून आणखी वेगाने पुढे सरकण्यास पोषक परिस्थिती निर्माण झाली आहे. आग्नेय अरबी समुद्र आणि पूर्व-मध्य बंगालच्या उपसागरात मान्सूनच्या हालचाली वेगाने होत असल्याचे हवामान खात्याने स्पष्ट केले आहे. यंदा मान्सून वेळेआधीच केरळात दाखल होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून, साधारणतः १ जूनला केरळ किनारपट्टीवर पोहोचणारा मान्सून यंदा २६ मेपर्यंत केरळात धडक देऊ शकतो, असा अंदाज आहे. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे मान्सूनला गती मिळाली आहे. विशेष म्हणजे, यंदा मान्सूनच्या सुरुवातीच्या टप्प्यात बंगालच्या उपसागरात किंवा अरबी समुद्रात कोणतेही चक्रीवादळ निर्माण झालेले नाही. त्यामुळे पान ४ वर

## राष्ट्रवादीत अंतर्गत कलह उफाळला?
## तटकरे-पटेल समर्थकांना दिल्ली कार्यालयात रोखले

नवी दिल्ली:राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात गेल्या काही दिवसांपासून अंतर्गत मतभेद सुरू असल्याच्या चर्चांना आता आणखी बळ मिळाले आहे. दिल्लीतील पक्ष कार्यालयात सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांच्या गटाशी संबंधित मानले जाणारे ज्येष्ठ नेते ब्रिजमोहन श्रीवास्तव यांना युवक कार्यकर्त्यांनी पक्ष कार्यालयात जाण्यापासून रोखल्यामुळे राष्ट्रवादीतील अंतर्गत कलह उफाळला असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पक्षाबाबत चुकीची माहिती पसरवणे आणि वरिष्ठ नेत्यांविरोधात गैरसमज निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करत युवक राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी ब्रिजमोहन श्रीवास्तव यांना जाब विचारला. दिल्लीतील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यालयात काही कार्यकर्त्यांनी त्यांना रोखून धरत पक्षाची बदनामी का करत आहात? असा सवाल केल्याचे सांगितले जाते.गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये संघटनात्मक पान ४ वर

### या तर अफवा-धीरज शर्मा

दिल्लीतील पक्ष कार्यालयात सुनील तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांना प्रवेश नाकारण्यात आल्याचे वृत्त पूर्णपणे खोटे असून पक्षाचे कार्यकर्ते आणि संपुर्ण संघटना पवार कुटुंबियांसह पटेल-तटकरे यांच्या पाठीशी असल्याचा दावा युवक राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष धीरज शर्मा यांनी स्पष्ट केले आहे.

## पेट्रोल-डिझेल दरवाढीचा सामान्यांना फटका
## भाजीपाला व जीवनावश्यक वस्तूंचे दर दुप्पट

नांदेड/प्रतिनिधी-केंद्र सरकारने गुरुवारी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रति लिटर सुमारे साडेतीन रुपयांनी वाढ केल्यानंतर त्याचे पडसाद आता बाजारपेठेत उमटू लागले आहेत. इंधन दरवाढीचा थेट परिणाम किरकोळ भाजीपाला तसेच जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवर झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या खिशावर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे.

बाजारात पूर्वी दहा रुपयांत मिळणारा भाजीपाला आता थेट वीस रुपये पाव किलो दराने विकला जात असल्याने ग्राहकांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. याशिवाय घरगुती वापरातील अनेक जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीतही मोठी वाढ झाल्याचे चित्र आहे. काही वस्तूंचे दर जवळपास दुप्पट झाल्याचे ग्राहकांचे म्हणणे आहे.दरम्यान, बाजारात भाजीपाल्यांचे दर वाढले असले तरी त्याचा थेट लाभ शेतकऱ्यांना मिळत नसल्याची खंत व्यक्त केली जात आहे. वाहतूक खर्च वाढल्यामुळे मध्यस्थांकडून दरवाढ होत असून शेतकरी आणि ग्राहक या दोघांनाही त्याचा फटका बसत असल्याचे सांगण्यात येत आहे.इंधन दरवाढीमुळे महागाईचा भडका उडण्याची शक्यता व्यक्त केली जात असून नागरिकांकडून सरकारने या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी होत आहे.

## मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगेंचे ३० मेपासून उपोषण

मुंबई/प्रतिनिधी-मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर आंदोलनाची हाक दिली असून, येत्या ३० मेपासून जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषण सुरू करणार असल्याची घोषणा केली आहे.

मराठा आरक्षणासाठी गेल्या अनेक दिवसांपासून सातत्याने आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी ही घोषणा करत राज्य सरकारवर तीव्र शब्दांत निशाणा साधला. यावेळी बोलताना जरांगे म्हणाले की, अडीच ते तीन वर्षांपासून मराठा समाज आरक्षणासाठी संघर्ष करत आहे. मात्र, समाजाच्या पदरात अद्याप काहीच पडलेले नाही. जून महिन्यात विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रिया सुरू होत आहेत. ५८ लाख नोंदी सापडल्या असूनही सरकार प्रमाणपत्र देण्यास टाळाटाळ करत आहे, असा आरोप त्यांनी केला.राज्य सरकारवर टीका करताना त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही थेट निशाणा साधला. हैदराबाद गॅझेटनुसार ३०८ च्या नोंदी निघाल्या



आहेत. अधिकारी सांगतात की सरकारने आदेश दिले नाहीत. मग आमच्या मुलांचे नुकसान झाल्यावर सरकार आदेश देणार का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. जरांगे पुढे म्हणाले की, मराठा समाजाला मोठं होऊ द्यायचं नाही, अशी सरकारची भूमिका दिसते. भाजपमधील मराठा नेत्यांच्या लेकीबाळींनाही आरक्षण लागणार नाही का? असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी सरकारच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली.मुंबईतील आंदोलनाचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, मुंबई तुम्ही विचाराने जिवंत केली. आता पुन्हा असे आंदोलन करायचे की राज्यात चारही दिशांना फक्त मराठेच दिसले पाहिजेत. तसेच, मी फडणवीसांना वैयक्तिक दोष देत नाही; पण अधिकारी प्रमाणपत्र देत नसतील तर त्यासाठी मुख्यमंत्रीच जबाबदार आहेत, असा आरोपही त्यांनी केला. यावेळी आंदोलनासाठी मोठ्या प्रमाणावर मराठा समाज एकत्र येणार असल्याचा दावा करत जरांगे म्हणाले की, ३० मे रोजी अंतरवाली सराटीत तीन कोटींपेक्षा अधिक मराठे जमा होतील. सरकारला गुडघ्यावर आणल्याशिवाय आंदोलन थांबणार नाही. दरम्यान, उपस्थित मराठा बांधवांनी जरांगेंना आमरण उपोषण करू नये, अशी विनंती केली. मात्र, उपोषणाशिवाय पर्याय उरलेला नाही, असे सांगत त्यांनी आंदोलनाचा निर्धार कायम असल्याचे स्पष्ट केले.

## पेपरफुटी प्रकरणी मोटेगावकर वादाच्या भोवऱ्यात

नांदेड/प्रतिनिधी-वैद्यकीय प्रवेश पूर्व परीक्षा असलेल्या नीट पेपरफुटी प्रकरणी लातूर, नांदेड येथील कोचिंग क्लास चालक शिवराज मोटेगावकर यांची काल लातूरात सीबीआयच्या पथकाने दिर्घकाळ चौकशी केली. पेपरफुटी प्रकरणात त्यांच्या सहभागावर समाज माध्यमांमध्ये उलट-सुलट चर्चा सुरु झाल्या आहेत. याप्रकरणात त्यांचे पुन्हा एकदा चौकशी होवून ते वादाच्या भोवऱ्यात अडकतील अशी शक्यता विद्यार्थी व पालकांमध्ये व्यक्त केली जात आहे.




वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेश मिळविण्यासाठी अनेक पालक दहावी नंतर आपल्या पाल्यांना चांगल्या टिव्हीशन क्लासेसमध्ये प्रवेश देण्यासाठी धडपडत असतात. यावर्षीच्या नीट परीक्षेचे पेपर फुटले आणि त्याचे थेट कनेक्शन महाराष्ट्रातील पुणे, नाशिक, लातूरशी जोडल्या गेल्याने अनेकांना धक्का बसला. शिवराज मोटेगावकर यांनी नीटची परीक्षा झाल्यानंतर विद्यार्थांशी संवाद साधणारी एक क्लिप समाज माध्यमांवर व्हायरल केली होती. यात मॉक टेस्टमधील सर्व प्रश्न जशाला तसे आल्याचे दोन विद्यार्थीनी सांगत आहेत. दरम्यान लातूरमधील एका पालकाने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय गाठत पेपरफुट प्रकरण उघडकीस येण्या अगोदरच लेखी तक्रार केली होती. या तक्रारीचा थेट संबंध मोटेगावकर यांच्या आरसीसी कोचिंग क्लासेसशी असल्याचे सांगितल्या जात आहे. विशेष म्हणजे या प्रकरणातील मुख्य सुत्रधार म्हणून सीबीआयने ताब्यात घेतलेले सेवानिवृत्त प्रा. कुलकर्णी हे देखील लातूरचे असल्याने मोटेगावकरांचा त्यांच्याशी काही संबंध आहे या संदर्भात सीबीआय अजूनही तपास करीत आहे.



नांदेड जिल्हा अभिवक्ता संघाच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ॲड.यदुपत अर्धापूरकर यांचा गुरुकृपा मार्केट व्यापाऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी नवज्योत फाऊंडेशनचे अध्यक्ष स.नौनिहालसिंघ जहागिरदार, स.नवज्योतसिंघ जहागिरदार, स.कुलप्रकाशसिंघ लिखारी,स.सतपालसिंघ गिल, स.परविंदरसिंघ शाहू, स.गणपतसिंघ कामठेकर, स.हरमितसिंघ रागी, विष्णू वट्टमवार आदी दिसत आहेत.

## शक्तिपीठ महामार्गाने तीर्थक्षेत्र माहूरलाच डावलले;महामार्गापासून तब्बल १७ कि.मी.दूर,भाविकांत संताप

### शक्तिपीठांच्या नावाने महामार्ग आणि प्रत्यक्षात शक्तिपीठांनाच वळसा

सरफराज दोसानी

माहूर:राज्य सरकारने धार्मिक पर्यटनाला चालना देण्यासाठी आणि प्रमुख शक्तिपीठांना जोडण्यासाठी मोठ्या गाजावाजात जाहीर केलेल्या नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्गाच्या सुधारित आराखड्यात मात्र तीर्थक्षेत्र माहूरलाच डावलण्यात आल्याची तीव्र प्रतिक्रिया उमटत आहे. शक्तिपीठ महामार्ग असे नाव देत सरकारने भाविकांच्या भावना जिंकण्याचा प्रयत्न केला, पण प्रत्यक्षात महाराष्ट्रातील अत्यंत महत्त्वाचे शक्तिपीठ असलेले माहूर हेच महामार्गापासून तब्बल १७ किलोमीटर दूर फेकले गेल्याने संताप व्यक्त होत आहे.

सुमारे ८३ हजार कोटी रुपये खर्चाच्या आणि सुरुवातीला ८०२ किलोमीटर लांबीच्या पवनार (वर्धा) ते पत्रादेवी (सिंधुदुर्ग) दरम्यानच्या या महामार्ग प्रकल्पाला फेब्रुवारी २०२४ मध्ये मंजुरी देण्यात आली होती. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे (एमएसआरडीसी) या प्रकल्पाची जबाबदारी सोपवण्यात आली होती. भूसंपादन प्रक्रियेलाही सुरुवात झाली होती. मात्र कोल्हापूरसह विविध भागांत शेतकरी आणि स्थानिक नागरिकांनी उग्र आंदोलन उभारल्यानंतर सरकारला माघार घ्यावी लागली. त्यानंतर विरोध असलेला भाग वगळून नव्याने आराखडा तयार करण्याचे आदेश देण्यात आले.नवीन आराखड्यानुसार महामार्गाची लांबी आता ८०२ किलोमीटरवरून ८५६ किलोमीटरपर्यंत वाढली आहे. मात्र या बदलामध्ये शक्तिपीठांना जोडण्याचा मूळ उद्देशच हरवल्याची टीका आता होत आहे.विशेष म्हणजे, रेणुका माता, दत्त शिखर आणि अनसूया माता मंदिरामुळे देशभर प्रसिद्ध असलेले माहूर हे शक्तिपीठ सुधारित महामार्गापासून तब्बल १७ किलोमीटर दूर गेले आहे. महागाव तालुक्यातील खडका आणि आर्णी तालुक्यातील कोसधनी गावाजवळून हा महामार्ग जाणार असून, माहूरला थेट जोडण्याऐवजी वळसा घालण्यात आल्याची भावना नागरिकांमध्ये आहे.

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या माहूरला महामार्गाशी थेट जोडले असते, तर धार्मिक पर्यटनासोबतच स्थानिक व्यापार, रोजगार आणि विकासालाही मोठी चालना मिळाली असती. मात्र आता शक्तिपीठ नाव फक्त कागदावर आणि प्रत्यक्षात शक्तिपीठांना दूर ठेवण्याचे काम सरकार करत असल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे.माहूरसह अनेक प्रमुख तीर्थक्षेत्रांचे महामार्गापासूनचे अंतर वाढले आहे. त्यामध्ये औंढा नागनाथ १४ किमी, परळी वैजनाथ ११ किमी, तुळजापूर १४ किमी, पंढरपूर २५ किमी, कोल्हापूर महालक्ष्मी मंदिर ८ किमी,




कुणकेश्वर शिवमंदिर २५ किमी आणि रेडी गणपती ३२ किमी दूर गेले आहेत.धार्मिक पर्यटन वाढवण्याचा दावा करणाऱ्या सरकारनेच प्रमुख तीर्थक्षेत्रांना महामार्गापासून दूर ठेवण्याचा निर्णय घेतल्याने भाविक आणि स्थानिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. विशेषतः माहूरसारख्या ऐतिहासिक, जागृत आणि राज्याच्या धार्मिक ओळखीचे केंद्र असलेल्या शक्तिपीठाला दुय्यम वागणूक दिली जात असल्याची भावना आता उघडपणे व्यक्त होऊ लागली आहे. शक्तिपीठांच्या नावाने महामार्ग आणि प्रत्यक्षात शक्तिपीठांनाच वळसा अशी उपरोधिक चर्चा आता जनमानसात रंगू लागली आहे.

## नीट पेपर लीक प्रकरण: पुण्यातील वरिष्ठ शिक्षिकेला अटक

नवी दिल्ली:मनीषा गुरुनाथ मंडहरे असं अटक करण्यात आलेल्या आरोपीचं नाव असून त्या पुण्यातील वरिष्ठ बॉटनी शिक्षिका आहेत. सखोल चौकशीनंतर त्यांना दिल्लीत अटक करण्यात आली. सीबीआयच्या माहितीनुसार, मनीषा मंडहरे या एनटीएकडून एक्सपर्ट म्हणून नियुक्त करण्यात आल्या होत्या आणि त्यामुळे त्यांना प्रश्नपत्रिकांपर्यंत थेट प्रवेश होता.तपास यंत्रणेच्या आरोपानुसार, पुण्यात घेतलेल्या विशेष कोचिंग सत्रांदरम्यान त्यांनी विद्यार्थ्यांना काही प्रश्न सांगितले होते, जे नंतर प्रत्यक्ष नीट-यूजी २०२६ परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेशी पान ४ वर

# वाढत्या महागाईवर युद्धाचा तडका

आखाती देशांमध्ये निर्माण होणारे तणाव आणि युद्धस्थिती जगभरातील अर्थव्यवस्थेला हादरे देणारी ठरते. इंधन उत्पादन आणि पुरवठ्याच्या दृष्टीने आखाती देशांचे महत्त्व मोठे असल्यामुळे तेथील संघर्षाचा परिणाम पेट्रोलियमच्या किमती, महागाई आणि आर्थिक स्थैर्यावर दिसून येतो. आज वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवरही अशीच परिस्थिती निर्माण होताना दिसत आहे.आखाती देशांतील युद्धामुळे जगभरात इंधन तुटवड्याची स्थिती निर्माण झाली आहे. त्यातून इंधनाचे दर वाढले असून त्याचा थेट परिणाम महागाईवर होत आहे. पेट्रोल आणि डिझेल हे केवळ वाहनांसाठीचे इंधन नसून संपूर्ण अर्थव्यवस्थेचे रक्तवाहिनीसारखे काम करते. वाहतूक व्यवस्था, औद्योगिक उत्पादन, शेती, व्यापार आणि दैनंदिन जीवनातील अनेक घटक इंधनावर अवलंबून आहेत. त्यामुळे इंधनाचे दर वाढले की वस्तूंच्या उत्पादन खर्चात वाढ होते आणि त्याचा भार अखेरीस ग्राहकांवर पडतो.गेल्या काही वर्षांपासून जगाने एकामागून एक युद्धांचा अनुभव घेतला आहे. रशिया-युक्रेन संघर्षाचे परिणाम अद्यापही पूर्णपणे संपलेले नाहीत, तोपर्यंत अमेरिका, इराण आणि इराकमधील तणावाने नव्या संकटाची चाहूल दिली आहे. आधुनिक काळात औद्योगिकीकरण, व्यापार आणि जागतिकीकरणामुळे देश एकमेकांशी आर्थिकदृष्ट्या जोडले गेले आहेत. त्यामुळे एका भागातील अस्थिरता संपूर्ण जगावर परिणाम करत असते. युद्ध हे कोणालाही परवडणारे नसते, कारण त्याची किंमत केवळ सैनिक नव्हे तर सर्वसामान्य नागरिकांनाही चुकवावी लागते. इतिहासात पाहिले तर १९८० च्या दशकातील इराण-इराक युद्धाच्या काळातही अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी पेट्रोल आणि डिझेलच्या पुरवठ्यावर परिणाम झाला होता. देशातील अनेक शहरांमध्ये पेट्रोल पंपांवर मोठ्या रांगा लागत होत्या. सार्वजनिक वाहतूक, मालवाहतूक आणि खासगी वाहनचालकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले होते. आज परिस्थिती वेगळी असली तरी संकटाचे स्वरूप जवळपास तसेच दिसत आहे. भारतातही वाढत्या महागाईची परिस्थिती काही महिन्यांपूर्वीच निर्माण होण्याची शक्यता होती, अशी चर्चा केली जात आहे. परंतु पाच राज्यांच्या निवडणुकांमुळे केंद्र सरकारने काही काळ परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न केला, असा आरोप विरोधकांकडून केला जात आहे. निवडणुका संपल्यानंतर पंतप्रधानांनी देशातील आर्थिक परिस्थिती आणि इंधन तुटवड्याच्या संभाव्य परिणामांबाबत नागरिकांना काही उपाययोजना सुचवल्या. अनेकांनी त्या परिस्थितीची अपरिहार्यता मान्य केली असली तरी सामान्य जनतेच्या मनात काही प्रश्न कायम आहेत.सरकारचे म्हणणे आहे की पेट्रोलियम कंपन्यांना मोठ्या प्रमाणावर तोटा सहन करावा लागत आहे. मात्र दुसरीकडे या कंपन्यांच्या आर्थिक स्थितीबाबत सकारात्मक चित्र सादर केले जाते. त्यामुळे सर्वसामान्यांच्या मनात प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. जर कंपन्या तोट्यात असतील, तर त्यांचे आर्थिक अहवाल आणि नफ्याचे चित्र वेगळे का दिसते? याबाबत स्पष्टता आवश्यक आहे. सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे करव्यवस्था. भारतात पेट्रोल आणि डिझेलच्या दरामध्ये करांचा मोठा हिस्सा असतो. सरकार अनेक देशांतील इंधन दरवाढीचे उदाहरण देत असते, परंतु त्या देशांतील करांचे प्रमाण आणि नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सवलतींचा उल्लेख केला जात नाही. त्यामुळे दरवाढीऐवजी करकपात करून सामान्य नागरिकांना दिलासा देण्याची अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. महागाईचा सर्वात मोठा फटका गोरगरीब आणि कष्टकरी वर्गाला बसतो. एकीकडे रोजगाराच्या संधी कमी होत आहेत, तर दुसरीकडे जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढत आहेत. या दुष्टचक्रात सर्वसामान्य नागरिक आर्थिकदृष्ट्या भरडला जात आहे. संकटाच्या काळात बचत आवश्यक असली तरी प्रत्येक व्यक्तीकडे बचतीची क्षमता असतेच असे नाही.आजची गरज केवळ परिस्थितीचे समर्थन करण्याची नाही, तर सर्वसामान्यांना दिलासा देणारे उपाय शोधण्याची आहे. जागतिक परिस्थितीवर कोणाचे नियंत्रण नसले तरी देशांतर्गत धोरणांद्वारे नागरिकांवरील भार कमी करता येऊ शकतो. महागाईचे संकट केवळ आर्थिक नसून सामाजिक प्रश्नही बनू शकते. त्यामुळे सरकारने करकपात, रोजगार निर्मिती आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमती नियंत्रणात ठेवण्यासाठी ठोस पावले उचलण्याची गरज आहे. कारण शेवटी कोणत्याही युद्धाचा सर्वाधिक फटका रणांगणावर नव्हे, तर सामान्य माणसाच्या घरातील चुलीवर बसत असतो.




# बलात्काऱ्यांना तुरुंगात नाही; तर फासावर लटकविले पाहिजे

**रमेश लांजेवार**
नागपूर.


देशाचे अट्टल गुन्हेगार लैंगिक अत्याचारी व भ्रष्टाचारी आहेत कारण या दोन्ही गुन्हेगारांनी देशाचे संपूर्ण वाटोळे केले आहे. अत्याचाऱ्यांनी देशाच्या सभ्यतेवर व संस्कृतीवर काळीमा फासला;तर भ्रष्टाचाऱ्यांनी देशाच्या गोरगरीब जनतेचे रक्त पिऊन देशाला हवालदिल केले आहे.देशात वाढते मुलींवरील व महिलांवरील अत्याचार,मुलींचे व महिलांचे अपहरण या घृणास्पद वाढत्या घटनेने देश हादरला आहे. परंतु अत्याचाराच्या घटना थांबायला तयार नाही.महाराष्ट्रात दररोज २७ मुली ठरतात वासनेचा बळी, यावरून आपण समजू शकतो की देशात २८ राज्य आणि ८ केंद्रशाशित प्रदेश आहेत याही ठिकाणी असे अनेक घृणास्पद घटना मोठ्या प्रमाणात घडत असाव्यात यात तिळमात्र शंका नाही. देशातील वाढत्या अत्याचारामुळे व अपहरणाच्या घटनांमुळे समाजातील वातावरण भयभीत झाले असून सर्वसामान्यांनमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.तोच प्रकार भ्रष्टाचाराच्या बाबतीत आपल्याला पाहायला मिळतो. कारण देशातील वाढत्या भ्रष्टाचारामुळे देशात अनेक गंभीर समस्या निर्माण होऊन १४० कोटी जनतेचे वाटोळे होत आहे व आजच्या परिस्थितीत भारत भ्रष्टाचाराच्या बाबतीत जगात अव्वल स्थानावर आहे त्यामुळेच देशात महागाने उच्चांक गाठला आहे.देशातील भ्रष्टाचारी गोरगरीबांचे, शेतकऱ्यांचे, सर्वसामान्यांचे, मजुरांचे रक्त पिऊन आज गडगंज झाले आहेत व आपला संपूर्ण पैसा देश-विदेशात गुंतवून ठेवला आहे. आज मुठभर भ्रष्टाचाऱ्यांमुळे देशांचे संपूर्ण वाटोळे होत आहेत यात सर्वात जास्त राजकीय पुढारी दिसून येतात.

असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स (एडीआर) च्या २०२४ च्या अहवालानुसार,सध्याच्या लोकसभेत सुमारे ४४% (सुमारे २४० पेक्षा जास्त) खासदारांनी त्यांच्यावर गंभीर फौजदारी गुन्हे दाखल असल्याची माहिती स्वतःच्या शपथपत्रात दिली आहे. यातील अनेक गुन्हे हे भ्रष्टाचाराशी, आर्थिक गैरव्यवहारांशी आणि इतर गंभीर प्रकरणांशी संबंधित आहेत. यावरून स्पष्ट होते की, भ्रष्टाचाराचे व गुन्हेगारीचे सुत्रधार राजकीय पुढारीच आहेत. त्यामुळेच आज भ्रष्टाचाराची किड संपूर्ण क्षेत्रात लागलेली दिसून येते यामुळे सर्वसामान्यांचे जगणे अत्यंत अवघड व कठीण झाले आहे. आज देशातील वाढती महागाई, बेरोजगारी, महागडे शिक्षण, महागडी आरोग्य सुविधा, वाढते कुपोषण, भुकमरी या संपूर्ण घटना वाढत्या भ्रष्टाचारामुळे निर्माण झाल्या आहेत आणि याचे प्रायश्चित्त देशाची १४० कोटी जनता आजही भोगत आहे. आज आपण पहातो की, मुठभर भ्रष्टाचारी करोडोंचे भ्रष्टाचार करून आणि त्यांच्या कारणाम्याची हजारो कागदांची फाईल बनुनही निर्दोष सुटतात व हेच भ्रष्टाचारी आज आपल्याला सत्तेमध्ये दिसून येतात. भ्रष्टाचाऱ्यांवर भ्रष्टाचाराच्या अनेक केसेस दाखल असतांना सुध्दा त्यांना अचानक सरकारचा आश्रय मिळतो व सरकारकडून त्यांना क्लीन चिट दिली जाते आणि हेच भ्रष्टाचारी देशाच्या १४० कोटी जनतेला ग्यान पाजतांना दिसतात हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल. आज देशात दररोज बलात्काराच्या, मुलींवरील अत्याचाराच्या व अपहरणाच्या महाभयानक घटना दररोज होतांना आपण पहातो.परंतु यांच्यावर कठोर कारवाईचे प्रावधान नसल्याने अनेक गुन्हेगार खुलेआम फिरताना दिसतात व कोर्टामध्ये तारीख पे तारीख असा लपंडाव दिसून येतो.आसाराम बापू ला एक अल्पवयीन मुलीवर बलात्काराच्या आरोपाखाली जोधपुर पुलिस ने ३१ ऑगस्ट २०१३ ला इंदौर आश्रम मधुन कैद केले होते तेव्हा पासून तर आज पर्यंत जेलमध्येच आहे परंतु कठोर शिक्षा किंवा फाशीच्या शिक्षेचा काहीही अतापता नाही. त्याचप्रमाणे २०१७ चा उन्नाव बलात्कार प्रकरणातील आरोपी कुलदीप सेंगर याला अजून पर्यंत फाशीची शिक्षा किंवा कठोर शिक्षा ठोठावण्यात आली नाही हेही देशाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.असे अनेक मोठमोठे दिग्गज देशात आहे की त्यांनी घृणास्पद कृत्य केले आहे परंतु कारवाई मात्र शुन्य आहे.असे अनेक प्रकार देशात घडले आहे व घडत आहे परंतु पिडीतांना अजूनपर्यंत न्याय मिळालेला नाही.उन्नाव बलात्कार प्रकरण जर फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून चालविले असते तर आतापर्यंत कुलदीप सेंगर फासावर लटकला असता. राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की काही लोक सत्तेच्या पडद्याआड अनेक घृणास्पद कृत्य करीत असतात.तेच काम कुलदीप सेंगरने सत्तेमध्ये असतांना २०१७ मध्ये केले. अशाप्रकारे देशात अनेक अत्याचाराच्या घटना आहेत की राजकीय आश्रयामुळे त्यांच्यावर कठोर कारवाई झालीच नाही आणि होणारही नाही.आतातर मुलींवरील व महिलांवरील अत्याचारांच्या बाबतीत भोंदूबाबांनी कळस गाठल्याचे दिसून येते दररोजच्या वृत्तपत्रात व मिडियाच्या माध्यमातून घृणास्पद प्रकरण उघडकीस येत आहे.त्यामुळे आता देशात वाढते अत्याचार पहाता; पोलिस विभागाला खुली सुट देऊन त्यांचा एन्काऊंटर किंवा फासावर लटकविने हाच पर्याय सरकारने स्वीकारला पाहिजे. आजही अनेक भोंदूबाबा व कूलदिप सेंगर सारखे अनेक राजकीय पुढारी राजकीय आश्रयाखाली जेलमध्ये शाही जिंदगी जगत आहे. परंतु त्यांना अजुनपर्यंत फाशीची शिक्षा किंवा कठोर शिक्षा ठोठावण्यात आली नाही हेही भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल. या कारणांमुळेच देशात मुलींवरील व महिलांवरील अत्याचारामध्ये मोठ्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ झाल्याचे दिसून येते. बलात्कारी आणि भ्रष्टाचारी यांच्यात यत्किंचितही फरक नाही कारण बलात्कारी हा संपूर्ण समाजाला कलंकित करून १४० कोटी जनतेवर आघात करतो;तर भ्रष्टाचारी हा भ्रष्टाचाराच्या माध्यमातून करोडोंची संपत्ती देश-विदेशात जमा करून १४० कोटी जनतेचे कळतनकळत रक्त पित असतो व संपूर्ण समाज व्यवस्थेला आर्थिक नुकसान पोहचवुन पोखरत असतो. देशात शक्ती कायद्यात गुन्हेगाराला २१ दिवसांत फाशी देण्याची तरतूद आहे. मात्र दुर्दैवाने हा कायदा केंद्राकडे अंतिम मंजुरीसाठी प्रलंबित असल्याचे सांगितले जाते.आज शक्ती कायदा राज्यासह देशात लागू असता तर उन्नाव बलात्कार प्रकरणातील आरोपीं कुलदीप सेंगर किंवा नसरापूरच्या नराधमाला किंवा अन्य बलात्काऱ्याला २१ दिवसांत फाशीची शिक्षा झाली असती आणि अशा गंभीर गुन्हेगारांवर कायद्याचा धाक बसला असता.परंतु देशाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल की असा कायदा अमलात आणण्यासाठी राजकीय पुढारीच हिचकीचावतात. त्यामुळे आज बलात्कार प्रकरणातील भोंदूबाबा, कुलदिप सेंगर सारखे अनेक राजकीय पुढारी व बाहुबली हे राजकीय आश्रयाने जेलमध्ये शाही जिंदगी जगत आहे .यांना तर फाशीची शिक्षा व्हायला पाहिजे होती परंतु हे देशाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.आज देशात वाढते अत्याचार व भ्रष्टाचार पहाता यांच्यासाठी फक्त फाशीच्याच शिक्षेचे प्रावधान असायला हवे.कारण या दोन्ही घटना समाजाला लागलेली किड आहे.यावर नियंत्रण तेंव्हाच संभव आहे की, अशा अट्टल गुन्हेगारांना फाशीची शिक्षा जोपर्यंत होत नाही तोपर्यंत यात सुधारणा शक्य नाही.अट्टल गुन्हेगार, बलात्कारी, भ्रष्टाचारी, विविध गुन्हेगार अशा कैद्यांना सुधारण्याची संधी म्हणून कुटुंबातील व्यक्तीचे आजारपण,विवाह किंवा मृत्यू प्रसंगी पॅरोल किंवा फर्लो देण्याची तरतूद देशाच्या अनेक राज्यात आहे.परंतु देशातील अनेक राज्यांतील कैदी पॅरोल किंवा फर्लो वर असणारे अनेक कैदी अजुनही फरार असल्याचे सांगितले जाते.परंतु मी म्हणतो की, अशा अट्टल गुन्हेगारांना पॅरोल किंवा फर्लो का म्हणून द्यायचा? ज्यांना गुन्हा करतांना समाजाची किंवा देशाच्या जनतेचा आत्मा दुःखावण्याची थोडीशीही जाणीव नाही किंवा लाज वाटत नाही अशांना का म्हणून मोकळीक द्यायची! त्यामुळे वाढत्या भयावह घटना व मुलींवरील अत्याचार पहाता अट्टल गुन्हेगारांना सजा-ए-मौत हीच एकमेव सजा असायला हवी. देशात लैंगिक अत्याचार, बलात्कारी, अट्टल गुन्हेगार यापेक्षा सर्वात मोठे गुन्हे देशात घर करून बसले आहेत ते गुन्हेगार म्हणजे भ्रष्टाचारी आज देशाला व देशाच्या १४० कोटी जनतेला मुठभर भ्रष्टाचाऱ्यांनी पोखरून टाकले आहे. आज देशात भ्रष्टाचार येवढा उफाळलेला आहे की गरीब व सर्वसामान्यांचे रक्त पित आहे. त्यामुळे यांचा एन्काऊंटर होने किंवा फासावर लटकविले अत्यंत गरजेचे आहे यासाठी पोलीस विभागाला मोकळीक असने आवश्यक आहे. देशात भ्रष्टाचाराची जळे-मुळे सर्वात जास्त राजकीय वर्तुळात मोठ्या प्रमाणात दिसून येतात. त्यामुळे पोलिस विभागाला अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे भ्रष्टाचाऱ्यांच्या केसालाही धक्का लागत नाही व कायद्याच्या चाकोरीतून तारीख पे तारीख असा लपंडाव सुरू रहाते व कालांतराने सुटका होते.यालाही आश्चर्यच म्हणावे लागेल. आज भ्रष्टाचारी करोडो,अरबो रूपये घेऊन देशांच्या बाहेर फरार होतात आणि झाले आहेत. परंतु आपण काहीच करू शकत नाही व हातावर हात ठेवून बसुन राहातो. ही सुद्धा आपली शोकांतिका म्हणावी लागेल. मी केंद्र सरकारला व देशातील संपूर्ण राज्य सरकारांना विनंती करतो की, लैंगिक अत्याचार, मुलींचे आणि महिलांचे अपहरण करणारी टोळी व भ्रष्टाचारी यावर आळा घालण्यासाठी फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून किंवा शक्ती कायद्याच्या माध्यमातून गुन्हेगारांना फासावर लटकविले पाहिजे.जय हिंद.

# हदगांव शहरात नाल्यांची सफाई व इतर समस्या गंभीर ;नगरसेवकांनी लक्ष देण्याची गरज

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहराच्या मध्यभागातून तसेच विविध प्रभागांमधून (वॉर्ड) वाहणाऱ्या लहान-मोठ्या नाल्यांची स्वच्छता करणे अत्यंत गरजेचे झाले आहे. मात्र, सध्या नगरपरिषदेच्या निवडून आलेल्या नवीन नगरसेवकांनी मौण धारण केल्याने नागरिकांत आश्चर्य व्यक्त करण्यात येते आहे, आपल्या मर्यादित साधनांचा वापर करूनच नगराध्यक्षा कामकाज चालवत असल्याचे चित्र आहे.

शहरात एकूण किती नाले आहेत, याची कोणतीही ठोस आकडेवारी सध्यातरी उपलब्ध नाही. पावसाळ्यात येथील मुख्य रस्त्यावरील गटारी नेहमीच पाण्याने तुडुंब भरलेल्या असतात. यामुळे नागरिक आणि शहरातील वाहनचालकांच्या जीवाला सतत धोका निर्माण होतो. असे असूनही, तत्कालीन नगराध्यक्ष किंवा नगरसेवक या समस्येवर ठोस पावले उचलण्यात अपयशी ठरले आहेत.पावसाळा सुरू झाल्याने प्रशासनाने काही प्रमुख ठिकाणच्या नाल्यांची सफाई सुरू केली आहे. परंतु, ही तात्पुरती सफाई नागरिकांच्या आरोग्यासाठी पुरेशी व योग्य नाही, असा सूर जनतेतून उमटत आहे. शहरातील अनेक नाल्यांची अवस्था सध्या अत्यंत बिकट झाली आहे. शहरात जर मुसळधार पाऊस झाला, तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते राठी चौक दरम्यान मोठ्या प्रमाणावर पाणी साचते. याशिवाय राठी चौक, आझाद चौक, दत्त बर्डी रोड आणि मुल्ला गल्ली या भागातही दरवर्षी



पाणी तुंबते. ही समस्या वर्षानुवर्षे जशीच्या तशीच आहे. जागरूक नागरिकांच्या मते, हा त्रास टाळण्यासाठी पावसाळ्यापूर्वीच सर्व लहान-मोठ्या नाल्यांची आणि गटारींची पूर्णपणे (तळापासून) सफाई करणे आवश्यक आहे. आता या गंभीर समस्येकडे नगरसेवक नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी यांनी गांभीर्याने लक्ष देऊन कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी आशा हदगाव शहरवासी व्यक्त करत आहेत. हदगाव नगर परिषदेमध्ये दररोज कोणी तरी नगरसेवक न.पा.च्या दालनात दिसतात, पण न.पा.कार्यालयाच्या काही अंतरावर नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने घातक ठरत असलेल्या खोदकाम केलेल्या नालीच्या बाबतीत नगरसेवकांना माहिती असू नये ही आश्चर्याची बाब समजल्या जात आहे, याबाबत नागरिकांत विविध चर्चा ऐकवायास मिळत आहे.

## नगरसेवक गप्प का...?

हदगाव शहरातील जिल्हा परिषद शाळेसमोरील सार्वजनिक रोडच्या बाजूला नाल्याचे खोदकाम करण्यात आलेले आहे.जवळपास एक महीन्यापासून नाली खोदण्यात आली आहे, ही नाली कशासाठी खोदण्यात आली? या बाबत अनेक नगरसेवकांकडून माहीती घेण्याचा प्रयत्न केला असता त्यांना याबाबत काहीच माहिती दिसून आलेली नाही. न.पा.चे मुख्याधिकारी हे प्रशासकीय बैठकीमध्ये असल्याने त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. हे काम जवळपास एक महिन्यापासून आहे त्या स्थितीतच असून यामुळे येणाऱ्या जाणाऱ्या नागरिक, शालेय विद्यार्थ्यांना या नालीचा फार त्रास होत असल्याने या मातीचे बारीक कण हवेत उडून विद्यार्थ्यांच्या व नागरिकांच्या डोळ्यात, कानात, तोंडात जात आहेत. या सर्व प्रकारावर विद्यमान नगरसेवक गप्प का? असा सवाल उपस्थित होत आहे.

# प्रशासकीय दिरंगाईवर ओढले जाणार आसूड;'द महाराष्ट्र फाइल्स'२९ मे रोजी प्रेक्षकांच्या भेटीला!

**वैशपाल कांबळे**

मांडवी- शासकीय कार्यालयातील लाल फितीच्या कारभारात अडकलेल्या सामान्यांच्या संघर्षाची गाथा आता मोठ्या पडद्यावर येत आहे. भ्रष्टाचार, सत्तेचा दबाव आणि न्यायासाठीची झुंज यांचा वास्तववादी संगम असलेला 'द महाराष्ट्र फाइल्स' हा सामाजिक आशयाचा मराठी चित्रपट येत्या ९० मे रोजी प्रदर्शित होण्यासाठी सज्ज झाला आहे. नांदेड जिल्ह्याचे भूमिपुत्र संजीव कुमार राठोड यांनी या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची, लेखनाची आणि पटकथेची धुरा सांभाळली आहे. फाइल्समधील दडलेली सत्ये येणार समोर शासकीय कार्यालयांमध्ये वर्षानुवर्षे धूळ खात पडलेल्या फाइल्समध्ये अनेक धक्कादायक सत्ये दडलेली असतात. या 'फाइल्स' मुळे सामान्य नागरिकांची कशी होरपळ होते, याचे चित्रण या चित्रपटातून पाहायला मिळणार असल्याचे दिग्दर्शक संजीवकुमार राठोड यांनी सांगितले. एका शेतकरी कुटुंबाला न्यायासाठी करावा लागणारा संघर्ष आणि व्यवस्थेतील छुप्या यंत्रणांचे स्वरूप यावर हा सिनेमा प्रकाश टाकतो. चित्रपटाविषयी बोलताना दिग्दर्शक संजीवकुमार राठोड म्हणाले:फाइल अडकली आहे, काम पुढे सरकत नाही, असे आपण नेहमी ऐकतो. पण त्यामागचे वास्तव किती भीषण असू शकते, हे या सिनेमातून समोर येईल. प्रेक्षकांनी हा सिनेमा केवळ मनोरंजन म्हणून नाही, तर एक जबाबदारी म्हणून पाहावा. दिग्गज कलाकारांची फौज 'द महाराष्ट्र फाइल्स' मध्ये मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील नामांकित कलाकारांची मांदियाळी पाहायला मिळणार आहे. यामध्ये खालील कलाकार मुख्य व महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहेत: मंगेश देसाई, उषा नाडकर्णी, वीणा जामकर, सयाजी शिंदे, नागेश भोसले, सुनील गोडसे मंगली विशेष म्हणजे, या चित्रपटात सनी लिओनी, सपना चौधरी आणि गौतमी पाटील या देखील महत्त्वपूर्ण भूमिकेत प्रेक्षकांसमोर येणार आहेत. प्रशासकीय व्यवस्थेवर रोकठोक भाष्य करणारा हा सिनेमा सर्वसामान्य प्रेक्षकांसाठी प्रचंड औत्सुक्याचा विषय ठरत असून, २९ मे रोजी हा पडदा गाजवण्यासाठी सज्ज झाला आहे.या चित्रपटाचे ड्रेस डिझायनर व संजीव कुमार राठोड यांचे निकटवर्ती मांडवी येथील सामाजिक कार्यकर्ते सुरेश धर्मा राठोड यांनी सांगितले की, नांदेड जिल्ह्याच्या या भूमिपुत्राच्या चित्रपटाला भरभरून प्रतिसाद दयावा,असे आवाहन करण्यात आले आहे.




सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# शेतकरी,सामान्य नागरिकांपर्यंत जास्तीत जास्त योजना पोहोचवा-महापौर कविता मुळे

नांदेड/प्रतिनिधी-राज्य शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियानाच्या माध्यमातून शेतकरी, सामान्य नागरिक तसेच विविध घटकांपर्यंत शासनाच्या योजना प्रभावीपणे पोहोचविण्याचे काम सुरू आहे. या अभियानामुळे नागरिकांना एकाच ठिकाणी विविध योजनांचा लाभ मिळत असून शासन आणि जनतेतील दुवा अधिक मजबूत होत आहे, असे प्रतिपादन नांदेडच्या महापौर कविता मुळे यांनी केले.

नांदेड तहसील कार्यालयात आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात त्या बोलत होत्या. यावेळी आमदार आनंदराव बोंढारकर, आमदार बालाजीराव कल्याणकर, उपमहापौर दीपकसिंह रावत, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, तहसीलदार संजय वारकड यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.महापौर कविता मुळे म्हणाल्या की, छत्रपती शिवाजी महाराजांनी जनकल्याणाला सर्वोच्च प्राधान्य दिले होते. त्याच प्रेरणेने महसूल विभाग आणि इतर शासकीय यंत्रणा



नागरिकांची कामे जलदगतीने मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील आहेत. विशेषतः ग्रामीण भागातील नागरिकांपर्यंत योजनांची माहिती आणि प्रत्यक्ष लाभ पोहोचविण्याचे काम या अभियानातून प्रभावीपणे होत असल्याचे त्यांनी सांगितले.आमदार आनंदराव बोंढारकर यांनी शासन आपल्या दारी या संकल्पनेचा उल्लेख करत सांगितले की, शासनाने नागरिकांना थेट लाभ देण्यासाठी विविध उपक्रम राबविले आहेत. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वाखाली लोकाभिमुख निर्णय घेतले जात असून या शिबिरांमुळे नागरिकांचे प्रश्न जागेवर सोडवले जात आहेत.

# जेईई-ॲडवान्सड परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

नांदेड/प्रतिनिधी-जेईई-ॲडवान्सड २०२६ परीक्षा रविवार १७ मे २०२६ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५.३० या कालावधीत नांदेड जिल्ह्यात ४ परीक्षा केंद्रावर घेण्यात येणार आहे. या परीक्षा केंद्र परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी प्रतिबंधात्मक आदेश निर्गमीत केले आहेत.

या आदेशात नमूद केलेल्या आर.जी.जी. हायटेक डिजीटल झोन / राजीव गांधी कॉलेज कॅम्पस विद्युत नगर नांदेड, आय ऑन डिजीटल झोन विष्णुपुरी नांदेड, एसएसएस इंदिरा इंन्स्टीटूट ऑफ टेक्नॉलॉजी विष्णुपुरी संयोग कॅम्पस नांदेड. श्री संभाजी कॉलेज ऑफ प्रायमरी शामल एज्युकेशन कॅम्पस देगावरोड समोर नांदला दिग्रस खडकूत या ४ परीक्षा केंद्रापासून १०० मीटरच्या परिसरात रविवार १७ मे २०२६ रोजी सकाळी ७ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंतच्या वेळेत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी-कर्मचारी या व्यतिरीक्त इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही. तसेच परीक्षेच्या कामाशी संबंधीत असलेले अधिकारी व कार्मचारी या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस कॅल्क्युलेटर, ट्रॅन्टीस्टर, रेडिओ, लॅपटॉप, इत्यादी तत्सम साहित्य परीक्षा केंद्राच्या ५०० मीटर पर्यंत परिसरात वापरण्यास व जवळ बाळगण्यास तसेच परीक्षा केंद्रात नेण्यास त्याचप्रमाणे सर्व सार्वजनिक टेलिफोन्स, एस.टी.डी., आय.एस.डी, भ्रमणध्वनी, पेजर, फॅक्स, झेरॉक्स आणि ध्वनिक्षेपक चालू ठेवण्यास या आदेशाद्वारे प्रतिबंध करण्यात आले आहे.

# ऑपरेशन क्रॅक डाऊनचा अंबाडीत धडाका; अवैध दारु विक्रेत्यावर पोलिस कारवाई

किनवट/प्रतिनिधी-ऑपरेशन क्रॅक डाऊन अंतर्गत किनवट पोलिसांची अंबाडी गावातील अवैध दारू विक्रेत्यावर कारवाई केली असून यापुढे किमान पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या कार्यकाळात तरी अंबाडी गाव दारु विक्री मुक्त असेल असे पोलीस निरीक्षकांच्या कार्यपद्धतीवरुन स्पष्ट होते. गुटखा, मटका, अवैध दारू धंद्याचे समूळ उच्चाटन करण्यासाठी ऑपरेशन क्रॅक डाऊन गतीमान केले असल्याचे वृत्त आहे.

किनवट पोलीस ठाण्यात गु.र.नं १००/२६ महाराष्ट्र दारू बंदी कायदा कलम ६५ ई अंतर्गत गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. तत्पूर्वी पोलीस उपअधीक्षक रामकृष्ण मळघणे आणि पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या आदेशानुसार १३ मे रोजी पोउनि.झाडे, पोहवा. डुक्रे, पोहवा. डगवाल, पोहवा. पुरी, पोशि. अन्नमवार, मपोशि. जानगेवाड, पोशि. अनंतवार यांच्या पथकाने अवैध पण गावकऱ्यांना आव्हान देत राजरोसपणे दारु विक्री करून पिढी बरबाद करणाऱ्या रामप्रसाद दर्शनलाल जैस्वालच्या घरावर धाड घालून मुद्देमाल जप्त करून कारवाई केली असल्याचे समजते.पोलीस निरीक्षक कराड यांच्या कार्यकाळात अनेक अवैध धंद्यांवर कारवाया होऊन काही गावांतील असे अवैध धंदे सिमापार झाल्याचे ऐकायला मिळते. अवैध धंद्याविरुद्ध पोलीस प्रशासनाने कितीही मोहीम तेज केली असली तरी, काळ-वेळ आणि सर्वांच्या नजरा चुकवून चालते फिरते का होईना परंतु कळतनकळत ही धंदे चालणारच. कारण काहींच्या उपजीविका अगदी त्याच धंद्यांवर निर्भरुन आहेत. गाव आणि युवापिढी बरबाद होईल इतपत ती धंदे नसावीत अशा लोकभावना देखील ऐकायला मिळताहेत.

# घरकुल योजनेत माहूरचा राज्यात ठसा

## पंचायत समितीस राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट तालुका तृतीय क्रमांकाचा मान

माहूर/प्रतिनिधी-प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून माहूर पंचायत समितीने राज्यस्तरावर मानाचा बहुमान पटकावला आहे. महा आवास अभियान सन २०२३-२४ अंतर्गत उत्कृष्ट कामगिरीबद्दल माहूर पंचायत समितीस राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट तालुका या पुरस्काराचा तृतीय क्रमांक प्राप्त झाला आहे.

सैनिक स्कूल, सातारा येथे शुक्रवारी (ता.१५ मे) आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात केंद्रीय ग्रामीण विकास, कृषी व किसान कल्याण मंत्री शिवराज सिंग चौहान आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते माहूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस यांना प्रशस्तीपत्र व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत लाभार्थी मेळावा व महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रम सकाळी साडेअकरा वाजता मोठ्या उत्साहात पार पडला. माहूर तालुक्यात घरकुल योजना प्रभावीपणे राबवून पात्र लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहोचविण्यात प्रशासनाने उल्लेखनीय कार्य केले.या यशामध्ये विद्यमान गटविकास अधिकारी ज्ञानेश्वर टाकरस तसेच तत्कालीन गटविकास अधिकारी सुरेश कांबळे यांच्या कार्याची दखल घेत



केंद्रीय मंत्री आणि मुख्यमंत्र्यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला. राज्यस्तरीय तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाल्याने माहूर पंचायत समितीच्या कार्यसंस्कृतीचे कौतुक होत असून अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# ३० मेपर्यंत पेट्रोल पंप हटवा;अन्यथा १ जूनला शिवप्रेमींचे जनआक्रोश आंदोलन

उमरखेड/प्रतिनिधी-छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या सौंदर्यकरणाला अडथळा ठरत असलेला भारत पेट्रोल पंप ३० मे पूर्वी हटवावा, अन्यथा १ जून रोजी हजारोंच्या संख्येने शिवभक्त रस्त्यावर उतरून जनआक्रोश आंदोलन करतील, असा इशारा जिजाऊ ब्रिगेडच्या सरोजताई देशमुख यांच्यासह छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा कृती समिती व विविध सामाजिक संघटनांच्या वतीने येथील शासकीय विश्रामगृहात शुक्रवारी (दि.१५) आयोजित पत्रकार परिषदेत हा इशारा देण्यात आला.

गेल्या दहा वर्षांपासून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या प्रश्नावर केवळ राजकारण सुरू असून प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. आंदोलन, उपोषण, मोर्चे, निवेदने आणि तुरुंगवास भोगूनही प्रशासनाने पेट्रोल पंप हटविण्याबाबत कोणतीही ठोस भूमिका घेतली नाही. उलट जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित पेट्रोल पंपाला आणखी पाच वर्षांची लीज वाढवून दिल्याने शिवप्रेमींमध्ये संतापाची लाट निर्माण झाली आहे.यावेळी आयोजीत पत्रकार परिषदेला सरोजताई देशमुख, चक्रधर देवसरकर, स्वप्निल कनवाळे, गुलाब सूर्यवंशी, भैय्या पवार, यशोदा सोनटक्के, विद्वान केवटे, प्रवीण गादेकर, गोपाल झाडे, विजय चौधरी, शुभम माने, बसवेश्वर शिरसागर, प्रवीण देशपांडे, दिनेश रावते, चांदराव सुरोशे, अरुण ठाकरे, निखिल थोरात आदी उपस्थित होते. सरोजताई देशमुख यांनी प्रशासन व लोकप्रतिनिधींवर जोरदार टीका करताना म्हटले की, मोठमोठी आंदोलने, उपोषणे, मोर्चे होऊनही जिल्हाधिकाऱ्यांनी पेट्रोल पंपाची लीज वाढविलीच कशी? हा पेट्रोल पंप मालक सर्व राजकीय नेते आणि प्रशासनापेक्षा मोठा आहे का? त्यांनी आमदार, खासदार आणि पालकमंत्र्यांवरही निष्क्रियतेचा आरोप करत सर्वपक्षीय मोर्चा हा केवळ दिखावा होता का? असा सवाल उपस्थित केला.पुतळा कृती समितीचे अध्यक्ष भैय्या पवार यांनीही संतप्त भूमिका मांडत, महाराष्ट्रात कदाचित कुठेही महाराजांच्या पुतळ्यासाठी एवढे आंदोलन झाले नसेल, तेवढे आंदोलन उमरखेडमध्ये झाले आहे. तरीही प्रशासन हलत नाही. पेट्रोल पंपाची लीज वाढविताना आर्थिक व्यवहार झाला आहे का, याची चौकशी व्हावी, अशी मागणी केली.पत्रकार परिषदेत प्रशासनावर सत्ताधाऱ्यांचा दबाव आहे की प्रशासनच मुजोर झाले आहे, असा सवाल उपस्थित करण्यात आला.

# जिल्ह्यात १६ मेपासून जनगणनेला प्रत्यक्ष सुरुवात नागरिकांनी सहकार्य करावे-जिल्हाधिकारी

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यात जनगणना २०२७ अंतर्गत घरयादी व घरगणनेच्या पहिल्या टप्प्याला १६ मेपासून प्रत्यक्ष सुरुवात होत आहे. या पार्श्वभूमीवर प्रत्येक घरी प्रगणक आणि पर्यवेक्षक भेट देणार असून नागरिकांनी त्यांना आवश्यक सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

उन्हाची तीव्रता लक्षात घेता प्रगणक आणि पर्यवेक्षकांनी शक्यतो सकाळी व सायंकाळी जनगणनेची कामे पूर्ण करावीत, जेणेकरून उन्हाचा त्रास होणार नाही, अशी सूचनाही त्यांनी दिली. तसेच, घरी येणाऱ्या प्रगणक व पर्यवेक्षकांशी अतिथी देवो भवः या भावनेतून वागून त्यांना पाण्याची विचारपूस करावी, असे आवाहनही जिल्हाधिकारी श्री. कर्डिले यांनी नागरिकांना केले. उद्यापासून सुरू होणाऱ्या जनगणनेसाठी त्यांनी सर्व प्रगणक व पर्यवेक्षकांना शुभेच्छा दिल्या. निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी किरण अंबेकर, सहायक संचालक जनगणना कार्यालय मुंबई बी. प्रसाद, जिल्हा जनगणना समन्वय अधिकारी नेहाल धुरंधरे आणि तहसीलदार (महसूल) तथा जिल्हा जनगणना कक्ष प्रमुख विपिन पाटील यांनीही ग्रामीण भागात काम करणाऱ्या प्रगणक व पर्यवेक्षकांनी उन्हापासून संरक्षणाची काळजी घ्यावी, असे आवाहन केले आहे.

# मुलानेच केला वडिलांचा खून

नांदेड/प्रतिनिधी-कंधार तालुक्यातील हटक्याळ येथे मुलगाच ठरला वडिलाचा कर्दनकाळ, दगडाने ठेचून केली मुलानेच वडीलाची हत्या. या घटनेमुळे परिसरात दहशत निर्माण झाली आहे. ही घटना १४ मे रोजी गुरुवारी रात्री ११ वाजता घडली. आरोपीस पाच तासानंतर पोलिसांनी जेरबंद केले.

हटक्याळ येथील रहिवासी सुरेश बाबुराव मोरे (४८) यांचा १४ मे रोजी गुरुवारी रात्री ११ वाजताच्या सुमारास मुलगा सुदर्शन मोरे (२७) याने झोपेत असलेल्या वडिलाच्या डोक्यात दगड घालून खून केला. खुनाची माहिती प्राप्त होताच मयताची आई चौत्राबाई बाबुराव मोरे यांच्या फिर्यादीवरुन मुलगा सुदर्शन मोरे याच्या विरुध्द कंधार पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुरुवार १४ मे रोजी रात्री ९ वाजताच्या सुमारास चौत्राबाई बाबुराव मोरे (मयताची आई), बाबुराव मोरे (मयताचे वडील), मयत सुरेश बाबुराव मोरे, सुजित सुरेश मोरे, आणि सुदर्शन सुरेश मोरे हे सर्वजण जेवण करुन झोपले असता सुरेश यांचा लहान मुलगा सुदर्शन हा वडीलाचा कर्दनकाळ ठरला असून त्यानेच वडीलाच्या डोक्यात दगड घालून खून केला आहे. उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ.अश्विनी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि.चंद्रकांत जाधव, सपोनि विकास कोकाटे यांच्या टिमने अवघ्या पाच तासात आरोपी सुदर्शन यास पकडून जेरबंद केले.


CHANGE IN NAME

My (old name) is **NIRMALJIT KAUR** which now I am, changing as (new name) **NIRMALJIT KAUR CHANDOK**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by

**NIRMALJIT KAUR CHANDOK**

R/o Hira appartment H.no.3/6/239 flat no.3
Badpura Nanded-431601
M.No.-9921813727

CHANGE IN NAME

My (old name) is **PRAHLAD SINGH** which now I am, changing as (new name) **PRAHLAD SINGH BHATIA**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by

**PRAHLAD SINGH BHATIA**

R/o Hira appartment H.no.3/6/239 flat no.3
Badpura Nanded-431601
M.No.-9921813727

CHANGE IN NAME

My (old name) is **JANHAVI AGRAWAL** which now I am, changing as (new name) **JANHAVI VISHNUPRASAD AGRAWAL**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by

**JANHAVI VISHNUPRASAD AGRAWAL**

R/o Tamsa, post Hadgaon Dist.Nanded-431712
M.No.-7030555540


# पोलीस निरीक्षक बोलमवाड यांनी स्वीकारला देगलूर पोलीस ठाण्याचा पदभार

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर पोलीस ठाण्याच्या पोलिस निरीक्षक पदाचा कार्यभार बुधवारी मध्यरात्री नांदेड जिल्हा विशेष शाखेत कार्यरत असलेले पोलीस निरीक्षक सूर्य मोहन बोलमवाड यांनी स्वीकारला तर येथील कार्यरत पोलीस निरीक्षक मारुती मुंडे यांनी पोलीस अधीक्षक मुख्यालय (नियंत्रण कक्ष) येथे रुजू झाले आहेत.

नवीन पोलीस निरीक्षक म्हणून पदभार स्वीकारताच डीबी पथक प्रमुख तथा पोलीस उपनिरीक्षक महाजन मैसंवाड यांचा सह पथकाकडून स्वागत करण्यात आले. देगलूर शहरासह तालुक्यातील नागरिकांच्या अपेक्षा वाढल्या असून, पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाढत चाललेलैले अबे धंदे, शहरासह तालुक्यातील वाहतूक समस्या तसेच कायदा सुव्यवस्थेचे बिघडलेली घडी सुरळीत करण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर उभे आहे. गेला काही महिन्यापासून शहर व तालुक्यात अवैध व्यवसाय, रेती वाहतूक, वाहतूक नियमाचे उल्लंघन तसेच विविध गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू होती. त्यामुळे नवीन पोलीस निरीक्षक म्हणून सूर्य मोहन बोलमवाड यांच्या नियुक्तीकडे नागरिक अपेक्षेने पाहत आहेत. देगलूर शहरातील शांतता, कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवणे, आयोजित धंद्यावर कठोर कारवाई करणे तसेच सर्वसामान्य नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ करण्यासाठी त्यांनी प्रभावी पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान पोलीस विभागातील त्यांचा अनुभवाचा फायदा देगलूर तालुक्याच्या कायदा व्यवस्थापनाला निश्चितच होईल, असा विश्वासही अनेक देगलूर शहर व तालुक्यातील नागरिकाकडून व्यक्त करण्यात येत आहे.. सूर्य मोहन बोलमवाड यांनी देगलूर पोलीस ठाण्याचा पदभार स्वीकारल्याची वार्ता सकाळी वाऱ्यासारखे पसरतात देगलूर शहरातील नागरिकाकडून स्वागत करण्यासाठी गर्दी झाली होती.

# छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियानांतर्गत विविध योजनांच्या प्रमाणपत्रांचे वाटप

कुंडलवाडी/प्रतिनिधी-महसूल प्रशासनाकडे नागरिकांनी कोणतीही तक्रार केल्यास त्या तक्रारीचे तात्काळ निराकरण करण्यात येईल तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत वेळेत पोहोचविण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन बिलोलीचे तहसीलदार गजानन शिंदे यांनी केले. ते कुंडलवाडी येथे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियानांतर्गत समाधान शिबिर कार्यक्रमात बोलत होते.

कुंडलवाडी येथील शिवम मंगल कार्यालयात दि.१५ मे रोजी छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियानांतर्गत समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तहसीलदार गजानन शिंदे तसेच नगराध्यक्ष प्रेरणा कोटलावार यांच्या हस्ते कुंडलवाडी कार्यक्षेत्रातील विविध लाभार्थ्यांना डिजिटल सातबारा फेरफार उतारा, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, नॉन-क्रीमीलेयर प्रमाणपत्र आदी कागदपत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच श्रावणबाळ योजना, संजय गांधी निराधार योजना यांसह विविध शासकीय योजनांच्या लाभांचे प्रमाणपत्रही वितरित करण्यात आले.या कार्यक्रमास नायब तहसीलदार परळीकर, कृषी अधिकारी गुडूक, वैद्यकीय अधिकारी विवेक बोरसे, तानाजी सूर्यवंशी, उपनगराध्यक्ष प्रतिनिधी शैलेश याकावार, साईनाथ उत्तरवार, गजानन कोटलावार, नगरसेवक प्रदीप खेळगे, मुख्तार खाजा मिया, सचिन कोटलावार, अमरनाथ कांबळे, नरेश ठाकूरवार, राजेश गटूवार, राहुल सबनवार, संतोष शिवशेट्टे, श्रीमती ज्योती जिगळे, मंडल अधिकारी पवन ठकरोड, धनंजय माळेगावकर, भगवान कांबळे, शरद पाटील, राजू गाडेकर, के.जी. लांडगे यांच्यासह ग्राम महसूल अधिकारी धर्मकरे, अभंगे, सतीश चव्हाण तसेच कृषी विभाग, आरोग्य विभाग, भूमी अभिलेख विभाग, मुद्रांक विभाग, पंचायत विभाग व नगरपरिषद विभागातील अधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# शासनाचे थकीत बिल आणि जनतेचा जीव टांगणीला;१०२ सेवा अखेर सुरु

## शिवसेना जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे यांच्या हस्तक्षेपानंतर सेवा पूर्ववत

माहूर/प्रतिनिधी-सर्वसामान्यांच्या आरोग्याशी संबंधित अत्यावश्यक सेवा पुरवण्यात शासन किती निष्काळजी आहे, याचे धक्कादायक उदाहरण माहूर येथे समोर आले आहे. ग्रामीण रुग्णालयातील १०२ रुग्णवाहिकेचा डिझेल पुरवठा थकीत बिलांमुळे थांबवण्यात आल्याने गरोदर माता, अपघातग्रस्त आणि गंभीर रुग्णांचे जीव अक्षरशः टांगणीला लागले होते. मात्र प्रशासनातील अधिकाऱ्यांनी याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याने नागरिकांमध्ये



संतापाची लाट उसळली आहे.

माहितीनुसार, शासनाकडून ज्या भक्ती पेट्रोलियम पेट्रोल पंपावरून रुग्णवाहिकेस इंधन पुरवठा केला जात होता, त्या पंपाचे डिसेंबर महिन्यापासूनचे बिल शासनाने थकवून ठेवले होते. वारंवार पाठपुरावा करूनही पैसे न मिळाल्याने अखेर पेट्रोल पंप व्यवस्थापनाने १ मेपासून डिझेल पुरवठा बंद करण्याचा निर्णय घेतला. परिणामी, ग्रामीण भागातील अत्यंत महत्त्वाची १०२ रुग्णवाहिका सेवा पूर्णपणे ठप्प झाली.विशेष म्हणजे, एवढी गंभीर परिस्थिती निर्माण होऊनही आरोग्य विभागातील जबाबदार अधिकारी आणि प्रशासनाने कोणतीही तत्परता दाखवली नाही. सामान्य नागरिकांचे जीव धोक्यात असताना शासन मात्र कागदी फाईली आणि निधीअभावाच्या कारणांमध्ये अडकून बसल्याचे चित्र दिसून आले.ही बाब समजताच उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख ज्योतीबा खराटे यांनी तातडीने ग्रामीण रुग्णालयाला भेट देत परिस्थितीची पाहणी केली. त्यानंतर त्यांनी संबंधित पेट्रोल पंप चालकासोबत चर्चा करून जनहितासाठी डिझेल पुरवठा पुन्हा सुरू करण्याची विनंती केली. त्यांच्या मध्यस्थीनंतर अखेर पेट्रोल पंप व्यवस्थापनाने सकारात्मक भूमिका घेत रुग्णवाहिकेला पुन्हा इंधन पुरवठा सुरू केला.शासन आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे बंद पडलेली सेवा एका विरोधी पक्षाच्या हस्तक्षेपामुळे सुरू होणे, ही बाब प्रशासनासाठी मोठी नामुष्की मानली जात आहे. जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्या या बेफिकीर कारभाराला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# शेतीसाठी स्वस्त डिझेल द्या-कॉ.राजन क्षीरसागर

नवी दिल्ली:शेती उत्पादनाचा वाढता खर्च आणि इंधनाच्या सातत्याने वाढणाऱ्या किमतींमुळे देशातील शेतकरी आर्थिक संकटात सापडत असल्याने शेतीसाठी स्वस्त आणि करमुक्त डिझेल उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजन क्षीरसागर यांनी केली आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात राजन क्षीरसागर यांनी म्हटले आहे की, ट्रॅक्टर, हार्वेस्टर, सिंचनासाठी वापरण्यात येणारे पंप आणि इतर कृषी यंत्रसामग्री मोठ्या



प्रमाणात डिझेलवर चालते. त्यामुळे डिझेल दरवाढीचा थेट परिणाम शेती उत्पादन खर्चावर होत आहे. आधीच बियाणे, खते, औषधे आणि मजुरीचे वाढलेले दर यामुळे शेतकरी अडचणीत असताना इंधन दरवाढ त्यांच्या समस्यांमध्ये अधिक भर घालत आहे.ते म्हणाले की, इंधनाच्या वाढत्या किमतीमुळे केवळ शेतकरीच नव्हे तर संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम होत आहे. शेतीमालाच्या उत्पादन खर्चात वाढ झाल्याने त्याचा परिणाम बाजारपेठेतील दरांवर आणि महागाईवरही होण्याची शक्यता आहे.शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कृषी क्षेत्रासाठी विशेष दराने सुमारे रुपये प्रति लिटर दराने डिझेल उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करत सरकारने याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, असेही राजन क्षीरसागर यांनी स्पष्ट केले.



नांदेड येथील जिल्हा हिवताप कार्यालयात आज राष्ट्रीय डेंग्यू दिवस साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.अमृत चव्हाण, आरोग्य पर्यवेक्षक गंगाधर गणलेवार, कैलाश लंकलवाड, आरोग्य निरिक्षक सत्यजित टिप्रेसवार, व्यंकटेश पुलकुंटवार, बालाजी निलपत्रेवार, मनोहर खानसोळे, सतीश शिंदे, वैभव कौसल्ये, शंकर मलदोडे,कैलाश वरपडे, माधवराव रणखांब, सुरेश पिंपळगावकर, परमेश्वर मठदेवरु यांच्यासह इतर उपस्थित होते.

# दाखले मिळविण्यासाठी जूनची वाट न पाहता आताच अर्ज करा-तहसीलदार डॉ.चोंडेकर

किनवट/प्रतिनिधी-शाळा, महाविद्यालय प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना लागणारे प्रमाणपत्रं आणि आवश्यक त्या दाखल्यासाठीची त्यांची धावपळ थांबावी म्हणून तहसीलदार डॉ.शारदा चोंडेकरांनी ११ मे पासूनच ऑनलाईन प्रणालीद्वारे प्रमाणात व दाखले पाठवण्याचे आवाहन केले आहे. जून महिन्यात प्रवेश प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थी आणि पालकांची एकच घाई निर्माण होऊन ऑनलाईन प्रणालीवर लोड निर्माण होऊन तांत्रिक समस्या निर्माण होण्याची शक्यता गृहीत धरून त्यांनी लोकहितावह पाऊल उचलले आहे. नागरिकांच्या प्रतिसादावर सुद्धा खूप काही अवलंबून आहे.

माहे जून मध्ये शेतकऱ्यांसह शाळा महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची विविध प्रकारचे प्रमाणातपत्रे आणि आवश्यक दाखले मिळविण्यासाठी धावपळ सुरू होते. सर्वांनी एकदाच प्रमाणपत्रे आणि दाखले मिळविण्यासाठी घाई केल्यास ऑनलाईन प्रणालीवर त्याचा ताण वाढून तांत्रिक अडचणी निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन तहसीलदार डॉ.चोंडेकरांनी ११ मे पासूनच ऑनलाईनद्वारा पाठवण्याचे लोकांच्या सोयीसाठी आवाहन केले आहे. ग्रामीण भागात ग्रामपंचायत पातळीवर ऑनलाईन प्रणाली कार्यान्वित केल्यानंतर लोकांचा लोंढा किनवट शहराकडे दिसतो. ऑनलाईन केल्यानंतर तहसील कार्यालयातील संबंधित टेबल क्र.एकवर जाते. त्या टेबलावरुन क्र.दोनच्या टेबलावर पाठवायचे असते. फक्त आणि फक्त तीन क्रमांकाच्या टेबलवरच कसलीही चिरीमिरी न घेता प्रमाणपत्र/दाखले मिळतात. याबद्दल काहींनी इतीवृतांत सांगून समाधान व्यक्त केले. तहसीलदारांनी अशा बाबींकडे या एक खिडकीच्या अनेक खिडक्या केल्या प्रकरणाला गांभीर्याने घ्यायला हवे अशा बोलक्या लोकभावना व्यक्त होताना दिसतात. ग्रामपंचायतीमधील संगनकँ ही लोकांच्या कामी येत नसतील तर या गंभीर प्रश्नी तहसीलदारांनी पहायला हवे.

# लाखो रुपये खर्चुनही तालुका तहाणलेला;६ तांड्यांना टँकर सुरु

मुखेड/प्रतिनिधी-तालुक्यातील सहा गावांतील ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या वाडी तांड्यावरील गावांना सहा टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू केल्याची माहिती प्र.गटविकास अधिकारी शिवाजी ढवळे यांनी दिली आहे. शासनाने टंचाईग्रस्त परिस्थितीत टँकर सुरु करण्याचे अधिकार उपविभागीय अधिकारी यांना प्रदान केले आहेत. या अनुषंगाने तालुक्याचे आमदार, तहसीलदार, गटविकास अधिकारी, उपअभियंता, पाणी पुरवठा जि. प. उपविभाग यांनी संयुक्त स्वाक्षरीने मंजुरी देणेबाबत प्रस्ताव सादर केला होता. उपविभागीय अधिकारी अनुप पाटील यांनी तालुक्यातील काळूतांडा, फकीरा तांडा/भनकूबाई तांडा, सावरगाव (पी.), जांभळीतांडा, लखुतांडा व सोसायटी तांडा येथे टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याचे आदेश दिले आहेत. सध्या तालुक्यात प्रचंड उन्हामुळे तापमान वाढल्याने पाणी पातळी खोल गेल्याने वाडी तांड्यावरील गावांना पाणी पुरवठा करणे आवश्यक होते. याची दखल घेऊन प्रशासनाने टँकर सुरू केले आहेत. मुखेड तालुका हा डोगराळ भाग म्हणून समजला जातो. तालुक्यात वाडी व तांड्याची संख्या खूप आहे. बंजारा समाज हा आपली शेती करण्यासाठी आपल्या शेताजवळच तांडेवस्ती निर्माण केली आहे. त्यामुळे प्रशासनाला पाणी पुरवठा करताना नाकी नवू येत आहेत. कितीही त्रास झाला तरी शेवटच्या माणसाला पाणी मिळाले पाहिजे अशी व्यवस्था आ. डॉ. तुषार राठोड हे करीत आहेत.

# महिला लोकशाही दिनाचे सोमवारी आयोजन

नांदेड/प्रतिनिधी-समस्याग्रस्त व पिडीत महिलांसाठी सोमवार दि.१८ मे रोजी महिला लोकशाही दिन आयोजित केला आहे. समस्याग्रस्त व पिडीत महिलांनी महिला लोकशाही दिनाच्या दिवशी आपले अर्ज विहित नमुन्यात सादर करावे, असे आवाहन जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी नांदेड व सदस्य सचिव तथा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी नांदेड यांनी केले आहे. दर महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन घेण्यात येतो. सोमवार १८ मे २०२६ रोजी सकाळी ११ वा. जिल्हाधिकारी नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली महसूल प्रबोधिनी (प्रशिक्षण केंद्र), एसबीआय एटीएमच्या मागे, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर नांदेड येथे महिला लोकशाही दिन होणार आहे. संबंधीत समितीचे सदस्य व शासन निर्णयात नमूद संबंधित विभागाचे अधिकारी यांनी उपस्थित रहावे, असेही आवाहन सदस्य सचिव तथा जिल्हा महिला व बालविकास अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

# वाढत्या वीज बिलासोबत अतिरिक्त सुरक्षा ठेवीचा भार

देगलूर/प्रतिनिधी-उन्हाळ्याच्या तीव्र झळामुळे वाढलेल्या वीज वापराचा फटका आता ग्राहकांना बसू लागला आहे. आधीच वाढलेल्या वीज बिलामुळे नागरिक त्रस्त असताना महावितरण करून अतिरिक्त सुरक्षा ठेव आकारण्यात आल्याने देगलूर तालुक्यातील ग्राहकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

सध्या तालुक्यातील तापमान ४३ अंश सेल्सिअसच्या पुढे गेले असून उखाड्यामुळे घराघरात कुलर, पंखे, फ्रिज, एसी आणि मोटर पंपाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे नियमित वीज बिलात मोठी वाढ झाली आहे. अशातच मे महिन्याच्या बिलामध्ये अतिरिक्त सुरक्षा ठेवीची रक्कम जोडण्यात आल्याने अनेक ग्राहकांना दुप्पट रकमे भरावी लागत आहे. अनेक ग्राहकांच्या मते, तीन ते चार हजार रुपयाचे नियमित बिल आता सहा ते सात हजार रुपये पर्यंत पोहोचले आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, मजुरानी लहान व्यवसायिकांना ही रक्कम भरणे कठीण जात आहे. काही ग्राहकांनी महावितरण कार्यालयात विचारणा केली असता, वीज वापराच्या सरासरी वरून सुरक्षा ठेव निश्चित केली जात असल्याचे सांगण्यात आले. ग्राहकांचे म्हणणे आहे की अतिरिक्त सुरक्षा ठेव आकारण्यापूर्वी महावितरणने योग्य पूर्व सूचना द्यायला हवी होती. तसेचही रक्कम हप्त्यामध्ये शिवकारावी किंवा आकांनीचा पुनर्विचार विचार करावा, अशी मागणी ही नागरिकाकडून होत आहे. कोणाला ६० रुपये तर कोणाला पाच हजाराचा फटका महावितरणकडून आकारली जाणारे सुरक्षा ठेव ही ग्राहकांच्या सरासरी वीज वापरावर आधारित असल्याचे सांगितले जात आहे.

# केमिस्ट असोसिएशनच्या निवडणुकीत प्रचंड चुरस

## नाव वगळल्यावरुन वाद

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्हा केमिस्ट ॲण्ड ड्रगीस्ट असोसिएशनच्या एक वर्ष उशिराने सुरु असलेल्या त्रेवार्षीक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज वापस घेण्याचा आजचा शेवटचा दिवस होता. जागा कमी आणि उमेदवारी अर्ज जास्त अशी या निवडणुकीचे चित्र झाले आहे. मतदार यादीतून अनेक ज्येष्ठांची नावे वगळल्यामुळे उमेदवारी अर्ज वापस घेण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी प्रचंड गोंधळाची परिस्थिती दिसून आली. वरिष्ठांकडून ही निवडणूक बिनविरोध करा अशा सुचना आहेत. परंतु पूर्वीच्या कार्यकारिणीने मतदार यादी करतांना अनेक घोळ केल्याने या निवडणुकीत आता प्रचंड चुरस निर्माण झाली आहे.

नांदेड जिल्हा केमिस्ट ॲण्ड ड्रगीस्ट असोसिएशनच्या त्रेवार्षिक निवडणुकीस आधीच एक वर्ष विलंब झालेला आहे. दरवेळेला अत्यंत शांततेत व बऱ्याचवेळेला बिनविरोध होणारी ही निवडणूक यावेळी अनेक कारणाने गाजत आहे. नवीन सभासद नोंदणी न करता असलेल्या जुन्या ज्येष्ठ सभासदांची नावे यादीतून वगळल्याचे निवडणूक प्रक्रिया सुरु झाल्यानंतर लक्षात आले. या संदर्भात काही सभासदांनी लेखी तक्रारी दाखल केल्या आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी या तक्रारींची अद्याप कुठलीही दखल घेतलेली नाही. राज्य आणि देश पातळीवरुन नांदेडची निवडणूक बिनविरोध करावी असे संदेश स्थानिक पदाधिकाऱ्यांना देण्यात आले होते. परंतु मतदार यादीतील घोळामुळे यावर्षीही निवडणूक चांगलीच चर्चेत आली आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज दुपारी २ पर्यंत वेळ निश्चित करण्यात आला होता. परंतु सायंकाळी उशिरापर्यंत उमेदवारी अर्ज वापस घेण्याची प्रक्रिया सुरुच होती.

# विद्यार्थ्यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊन नाव करावे-संजय भोसीकर

कंधार/प्रतिनिधी-विद्यार्थ्यांनी उच्च व गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊन आपल्या शाळेचे, पालकांचे आणि गावाचे नाव उज्वल करावे, असे प्रतिपादन कंधार तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संजय भोसीकर यांनी केले. ते माध्यमिक आश्रम शाळा, नेहरूनगर (लिंबोटी), ता. लोहा येथे इयत्ता दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात बोलत होते.

माध्यमिक आश्रम शाळेचा यंदाचा इयत्ता दहावीचा निकाल ८० टक्के लागला. यामध्ये ४



विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य, ११ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, २६ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी मिळवून यश संपादन केले. या यशस्वी विद्यार्थ्यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर संजय भोसीकर व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक अशोक सापनर यांनी केले. यावेळी काही पालकांनीही आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या भाषणात संजय भोसीकर यांनी आश्रम शाळेच्या निकालाची गुणवत्ता दरवर्षी उंचावत असल्याचे सांगत हे सातत्य कायम ठेवून विद्यार्थ्यांना अधिक दर्जेदार शिक्षण देण्याचे आवाहन केले. या प्रसंगी गावचे सरपंच माधवराव वाघमारे, मुख्याध्यापक अशोक सापनर, पर्यवेक्षक प्रवीण जोगे, ग्रामपंचायत सदस्य संभाजी माडगे, शिवा सुरनर, शिवाजी महाराज शेवणकर, सुधीर गित्ते, संभाजी बंडे, भीमाशंकर मलशेट्टे, संगमेश्वर मलशेट्टे, अशोक गित्ते, धनराज मलशेट्टे यांच्यासह पालक, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुस्तापुरे सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन संगम आंधळे यांनी केले.

# रुपाताई मानकर यांचे निधन

नांदेड/प्रतिनिधी-हर्सूल ता.दिग्रस येथील आदर्श शिक्षिका



पुरस्कार प्राप्त व सेवानिवृत्त मुख्याध्यापिका श्रीमती रुपाताई नागसेन मानकर (वय ८३) यांचे आज (शनिवार) दि.१६ मे रोजी सकाळी दुःखद निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर रविवार दि.१७ मे रोजी सकाळी १० वाजता हर्सूल येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगी, तीन मुले, सुना, जावई, नातवंड असा मोठा परिवार आहे.

पान १ वरुन

## नीट पेपर लीक प्रकरण:...

जुळल्याचं समोर आलं आहे. या प्रकरणात सीबीआयने देशभरातील अनेक ठिकाणी छापेमारी केली असून आतापर्यंत एकूण ९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तपास अजूनही सुरू आहे.नीट-यूजी २०२६ पेपर लीक प्रकरणात जीवशास्त्र प्रश्नपत्रिका लीकशी संबंधित आणखी एका मास्टरमाइंडला सीबीआयने अटक केली आहे. सीबीआयच्या तपासात जीवशास्त्र प्रश्नपत्रिका लीकचा मूळ स्रोत उघड झाल्याचा दावा करण्यात आला आहे. या प्रकरणात पुणे, महाराष्ट्र येथील वरिष्ठ बॉटनी शिक्षिका मनीषा गुरुनाथ मंडहरे यांना सखोल चौकशीनंतर दिल्लीतून अटक करण्यात आली आहे.

पान १ वरुन

## मान्सूनची अंदमानात...

मान्सूनच्या प्रवासात मोठा अडथळा येण्याची शक्यता नसून तो सुरळीतपणे पुढे सरकेल, असा विश्वास हवामान विभागाने व्यक्त केला आहे. दरम्यान, मान्सून ५ जूनपर्यंत गोव्यात दाखल होण्याची शक्यता असून ६ जूनपर्यंत कोकण किनारपट्टी गाठू शकतो. तसेच, ७ जूनपर्यंत पुण्यात मान्सून आगमनाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये खरीप हंगामाबाबत उत्सुकता वाढली आहे. एकीकडे मान्सूनची प्रगती होत असताना, दुसरीकडे ईशान्य भारत आणि दक्षिण भारतातील काही राज्यांना मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तामिळनाडू, केरळ, पुद्दुचेरी आणि दक्षिण कर्नाटकात पुढील चार ते पाच दिवस जोरदार पावसाची शक्यता आहे. तर उत्तर-पश्चिम, पश्चिम आणि मध्य भारतात उष्णतेची तीव्र लाट कायम राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. यंदाचा मान्सून वेळेआधी सक्रिय झाल्याने शेती, पाणीपुरवठा आणि हवामानाच्या दृष्टीने देशासाठी हा सकारात्मक संकेत मानला जात आहे.

## राष्ट्रवादीत अंतर्गत...

बदलांमुळे नाराजीचे वातावरण असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. पक्षाच्या नव्या राष्ट्रीय कार्यकारिणीतून प्रफुल्ल पटेल यांना वगळण्यात आल्याची चर्चा होती. तसेच सुनील तटकरे यांचाही प्रदेशाध्यक्ष म्हणून उल्लेख टाळण्यात आल्याने विविध तर्कवितर्कांना उधाण आले होते. याच पार्श्वभूमीवर १२ मे रोजी सुनील तटकरे यांनी अचानक शरद पवार यांच्या निवासस्थानी जाऊन भेट घेतल्याची माहिती समोर आली. त्याच दिवशी प्रफुल पटेल यांनीही शरद पवारांची भेट घेतल्याचे सांगितले जाते. या गुप्त बैठकींमुळे राजकीय वर्तुळात विविध तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. शरद पवारांच्या या भेटीने राष्ट्रवादीतील अंतर्गत संघर्ष आणखी गंभीर झाल्याची चर्चा रंगू लागली आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४